# MARATHI

## Paper I

## ( LITERATURE )

*Time allowed : **Three** Hours*

*Maximum Marks : **250***

### Question Paper Specific Instructions

***Please read each of the following instructions carefully before attempting questions :***

*There are **EIGHT** questions divided in two **SECTIONS.***

*Candidate has to attempt **FIVE** questions in all.*

*Questions no. **1** and **5** are compulsory and out of the remaining, **THREE** are to be attempted choosing at least **ONE** from each section.*

*The number of marks carried by a question / part is indicated against it.*

*Answers must be written in **MARATHI**.*

*Word limit in questions, wherever specified, should be adhered to.*

*Attempts of questions shall be counted in chronological order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the answer book must be clearly struck off.*

### SECTION A

**Q1.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर पन्नास (150) शब्दांत लिहा : *10×5=50*

(a) 'भाषा ही सानुक्रम ध्वनिरचनांच्या संकेतीकरणावर आधारलेली संज्ञापन प्रणाली आहे' या विधानाचे स्पष्टीकरण करा. *10*

(b) प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यांचे महत्त्व भिन्न-भिन्न प्रकारचे कसे आहे, ते थोडक्यात सांगा. *10*

(c) वऱ्हाडी बोलीचा थोडक्यात परिचय करून द्या. *10*

(d) शब्दांच्या जाती सांगून सर्वनाम, विशेषण, आणि क्रियाविशेषण यांची सोदाहरण माहिती द्या. *10*

(e) लोककथांमधून घडणारे सामाजिक दर्शन हे कोणकोणत्या दृष्टीने महत्त्वाचे असते ? *10*

| | | | |
|---|---|---|---|
| **Q2.** | (a) | नोम चॉम्स्की या भाषावैज्ञानिकाच्या दृष्टीने "'निर्मितिशीलता' हा मानवी भाषा व्यवहाराचा सर्वात महत्त्वाचा गुणधर्म" कसा आहे ते सांगून, भाषानिर्मितीच्या वेगवेगळ्या उपपत्ती कोणत्या ते सांगा. | *20* |
| | (b) | व्यवहारभाषा, साहित्यभाषा आणि शास्त्रभाषा यांची माहिती द्या. | *15* |
| | (c) | अहिराणी या बोलीभाषेसंबंधी असलेल्या वादाचे स्वरूप स्पष्ट करा. | *15* |
| **Q3.** | (a) | तेराव्या शतकातील मराठी भाषेची वैशिष्ट्ये संतकाव्याच्या आधारे स्पष्ट करा. | *20* |
| | (b) | मराठीतील विभक्तींची माहिती देऊन त्यांचे कारकार्थ कोणते ते लिहा. | *15* |
| | (c) | गण, गौळण, आणि वग यांमधून तमाशा हे लोकनाट्य कसे साकार केले जाते, ते विशद करा. | *15* |
| **Q4.** | (a) | मानवी भाषेची द्विस्तरीय रचना व यादृच्छिकता म्हणजे काय ? त्यांचे विविध फायदे सोदाहरण स्पष्ट करा. | *20* |
| | (b) | जात्यावरील ओव्यांमधून स्त्री-जीवनातील भावबंधांचे स्वरूप कसे व्यक्त होते, ते स्पष्ट करा. | *15* |
| | (c) | व्रतांच्या कहाण्यांमधून घडणाऱ्या संस्कृतिदर्शनाची माहिती द्या. | *15* |

## SECTION B

**Q5.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर पन्नास (150) शब्दांत लिहा : *10×5=50*

(a) वारकरी संप्रदायाने दर्शविलेला भक्तीचा मार्ग हा सामाजिक समतेकडे वाटचाल करणारा कसा होता, ते थोडक्यात स्पष्ट करा. *10*

(b) 'बखरी म्हणजे इतिहास आणि कल्पकता यांचे मिश्रण असल्यामुळे त्यांतील ऐतिहासिकता पारखून घ्यावी लागते' या विधानाचे स्पष्टीकरण करा. *10*

(c) केशवसुतांना आधुनिक कवितेचे जनक असे का म्हटले गेले, ते सांगा. *10*

(d) दलित कवितेमधून व्यक्त झालेल्या दलितांच्या वेदनांचे स्वरूप स्पष्ट करा. *10*

(e) सामाजिक बांधिलकी हे साहित्याच्या श्रेष्ठतेचे गमक मानता येईल का ? *10*

**Q6.** (a) 'लीळाचरित्र' या ग्रंथातून चक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाचे कोणकोणते पैलू दिसून येतात, ते स्पष्ट करा. *20*

(b) संत एकनाथांच्या काव्यकर्तृत्वातील विविधतेचा थोडक्यात परिचय करून द्या. *15*

(c) 'पोवाडा' या शाहिरी काव्याची थोडक्यात माहिती सांगा. *15*

**Q7.** (a) रविकिरण मंडळाच्या काव्याची पृथगात्म वैशिष्ट्ये कोणती ते सांगा. *20*

(b) व्यंकटेश माडगूळकर यांचे मराठी ग्रामीण साहित्यातील योगदान विशद करा. *15*

(c) संगीत नाटकांमधील संगीत हे नाट्यविषयाला पूरक किंवा मारक असते का ते सोदाहरण सांगा. *15*

**Q8.** (a) आधुनिक साहित्याची समीक्षा करताना संस्कृत साहित्यशास्त्राचा उपयोग कितपत होऊ शकेल, त्याची चर्चा करा. *20*

(b) साहित्याचे प्रयोजन हे साहित्याच्या स्वरूपावरून ठरविणे योग्य आहे की स्वतंत्रपणे ठरविणे योग्य आहे, याची शहानिशा करा. *15*

(c) स्त्रीवादी दृष्टिकोनातून सानिया यांच्या कथासाहित्याचे मूल्यमापन करा. *15*